Exh06

## व्हेरिफिकेशन

नेवासा
एस.टी.सी.नंबर ~~10012~~ 702 /2025

माझे नांव **गौतम उत्तम जगताप**, वय 42 वर्षे, धंदा- नोकरी, रा. नेवासा फाटा, ता. नेवासा, जि. अहमदनगर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,-

1) मी व आरोपी वर नमुद ठिकाणी रहात असून, आरोपी हे माझे मित्र जगदिश पांडुरंग वाघ यांचा पुतण्या असून, आरोपीने त्यांचे मालकीचे आठवडी बाजार येथील घर मला विक्रीबाबत आपआपसात व्यवहार ठरवून आरोपीने माझेकडून दि.04/07/2020 पासून ते दि.15/11/2020 पर्यत विसारापोटी वेळोवेळी रोख तसेच ऑनलाईन बँकींगद्वारे असे एकुण रक्कम रुपये 6,00,000/-अक्षरी रुपये सहा लाख मात्र ची स्विकारुन, लवकरच मिळकतीचे खरेदीखत करुन देण्याचे मान्य केले आहे.

2) आरोपीने माझेकडून मिळकतीचे व्यवहारापोटी वर नमुद केल्याप्रमाणे मोठी रक्कम घेवून अनेक दिवस होवून सुध्दा मिळकतीचे खरेदीखत करुन दिले नाही व आज उद्या करुन वेळकाढूपणा केली व शेवटी आरोपीने सदर घर मिळकतीचे संदर्भात त्याचे व भाऊबंदामध्ये वाद झाला असल्याचे सांगून घराची खरेदी देता येणार नाही असे सांगून विसारपोटी घेतलेली रक्कम परत देण्याचे मान्य केले. परंतु मी रक्कमेची आरोपीस वेळोवेळी मागणी केली असता आरोपीने आज देतो, उद्या देतो असे म्हणून रक्कम देण्यास टाळाटाळ केली परंतु मी वेळोवेळी जास्तच तागादा लावल्यानंतर आरोपीने रक्कम रुपये 58,000/- दिले व राहिलेल्या रक्कम रुपये 5,42,000/- करीता दि.19/02/2025 रोजी आरोपीचे खाते असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखा चिखलठाणा या शाखेचा चेक नंबर 119771 चा मला सही करुन दिला व तो निश्चित वटण्याची व रक्कम मिळण्याची खात्री व भरवसा दिला असल्याने सदरचा चेक मी स्विकारला.

Order
--------------------
Read & recorded

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.10.14 10:57:14 +0530

2nd JMFC

Scanned with OKEN Scanner

3) आरोपीने मला दिलेला चेक आरोपीचे सांगण्याप्रमाणे मी माझे खाते असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे भरला असता सदरचा चेक आरोपीचे खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यामुळे दि.27/02/2025 व दि.18/03/2025 रोजी न वटता परत आल्यामुळे सदर बाब मी आरोपीला कळविल्यावर आरोपीने मला सदरचा चेक पुन्हा बँकेत भरण्यास लावला तेंव्हा दि.26/03/2025 रोजी मी सदरचा चेक पुन्हा भरला असता आरोपीचे खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यामुळे, "फंडस इन सफिशिएंट" असा शेरा मारुन दि.27/03/2024 रोजी न वटता परत आला व तसे मला दि.27/03/2024 रोजीचे रिटर्न मेमो देवून कळविलेले आहे. व आरोपीने दिलेल्या चेकची रक्कम मला मिळालेली नाही. त्यामुळे माझे अतोनात असे आर्थिक नुकसान झालेले आहे व होत आहे. म्हणून मी आरोपीस दि.24/04/2025 रोजी ॲड.अरुण बलभिम बनकर, अहमदनगर यांचे मार्फत नोटीस पाठवून न वटलेल्या चेकच्या रक्कमेची मागणी केली, सदरची नोटीस आरोपीस मिळून देखील आरोपीने न वटलेल्या चेकची रक्कम आणून दिली नाही म्हणून माझी आरोपी विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

4) तरी माझ्या फिर्यादीची चौकशी होऊन आरोपीस जास्तीत जास्त कडक शिक्षा व दंड ठोठावण्यात येवून आरोपीने मला न वटणारा चेक देवून नुकसान केल्याने मला आरोपीकडून चेकच्या रकमेच्या दुप्पट रकमेची नुकसान भरपाई मिळावी हि विनंती.

वरील मजकुर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेसाठी या खाली सही करुन हा लेख पूर्ण केला असे.

ता.13 /~~06~~ 10/2025

अहमदनगर

ओळख

Adv. R.B. Pawar

प्रतिज्ञापत्र करणार

verified,

सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर

नेवासा

Scanned with OKEN Scanner